# वाचन संस्कृती

वाचन संस्कृती वाढविणे हा वाचनालयाचा उद्देश आहे. पुस्तकामुळे कमकुवत मनाला सकारात्मकपणाचा धीर मिळत असतो. तरुण पिढींना खूप ताण पडत असतो. हा ताण पुस्तकांच्या वाचनामुळे निश्चितच कमी होऊ शकतो ! वाचन केल्यानेच पुढील पिढीची वैचारिक पातळी वाढू शकते. वाचनामुळे विचार हे प्रगल्भ होत असतात. पुस्तकांनी शब्द संपदाच नाही तर विचारही समृध्द होतात. समृध्द विचारांचा आपल्या जीवनावर नेहमीच सकारात्मक परिणाम होत असतो.

" वाचेल तो वाचेल " ! हे जरी खरं असलं तरीही वाचन जेवढे आवश्यक आहे, तसेच काय वाचतो हे सुध्दा महत्वाचे आहे. मनाला संवेदनशील बनवणारी आणि वैचारिक पातळी वाढवणारी पुस्तके वाचण्याची आजही काळाची गरज आहे ! बालकांमध्ये आणि तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण करायची असेल तर ग्रंथालये निर्माण करणे आवश्यक आहे. पुस्तकांमुळे आयुष्याकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलतो. पुस्तकांनी केवळ शब्दसंपदाच नाही तर विचार समृध्द होतात. वाचनामुळे कुठल्याही विषयावर आपली मतं बनतात आणि जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन देखील बदलतो.

आज वाचनासाठी अनेक साधने, सुविधा उपलब्ध असूनही आजची तरुणपिढी मात्र यापासून दूर जात आहे.

कारण ती मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळ्यात अडकलेली आपणास पहावयास मिळते. यामुळे वाचनसंस्कृती दिवसेदिवस नष्ट होत चाललेली आहे असं चित्र निर्माण होत आहे. म्हणूनच बालक व तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ग्रंथालयांच्या माध्यमांतून विविध उपक्रम राबविण्यासाठी गरज समाजामध्ये निर्माण झालेली आहे. पुस्तकाचे वाचन कराल तेवढेच वैचारीक पातळीवरील अभ्यासाचे वाचन वाढत जाईल.

कुठल्याही विषयांसंदर्भात सखोल विचार करायचा असेल तर त्यासाठी वाचन आवश्यक आहे. ज्ञानात सतत भर घालण्यासाठी वाचन हे महत्वाचे आहे. वाचनाने विचार विकसित होतात आणि बुध्दीची मशागत होऊन त्यामुळे जीवन फुलत जाते. यासाठी पूर्वीही होते आणि आजही वाचनाचे एकमेव ठिकाण म्हणजे वाचनालय ! आज त्याची जागा इंटरनेट आणि ई- बुकने घेतलेली असली तरीही मनाचा विरंगुळा आणि मानसिक आनंद हा स्वत: हातात पुस्तक घेऊन वाचण्यानेच मिळत असतो. ग्रंथालये ही आपल्या मनाला विविध विषयांचा अभ्यास करावयास लावणारी विद्यापीठे आहेत असं म्हटलं तर ते वावगे ठरणार नाही ! या साठी पालकांनी आपल्या पाल्यास तसेच तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांनी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी योग्य साथ द्यावी यासाठी ग्रंथालये नाही ग्रंथच आपण घेण्यासाठी वाट पहात आहेत. मग आपण पुस्तकांचे मित्र होणार ना !